डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण संस्था चांदा, संचालित

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर (महाराष्ट्र)

## मराठी समाजशास्त्र परिषदेचे २९ वे राष्ट्रीय अधिवेशन

## "जनसंवाद आणि सामाजिक माध्यमांचा भारतीय समाजावर प्रभाव"

दिनांक : १८ व १९ जानेवारी २०१९

# प्रमाणपत्र

श्री / श्रीमती / प्रा. / डॉ. विनोद बी. खेडकर

विद्यापीठ / महाविद्यालय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

यांनी समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ब्रम्हपुरी, जि. चंद्रपुर द्वारा आयोजित दि. १८ व १९ जानेवारी २०१९ रोजी "जनसंवाद आणि सामाजिक माध्यमांचा भारतीय समाजावर प्रभाव" या दोन दिवसीय मराठी समाजशास्त्र परिषदेच्या २९ व्या राष्ट्रीय अधिवेशनात सहभाग घेतला / शोधनिबंधाचे वाचन केले, याबद्दल हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

शोधनिबंधाचे शिर्षक प्रसारमाध्यमे आणि ग्रामीण विकास

डॉ. सरोज आगलावे
अध्यक्ष
मराठी समाजशास्त्र परिषद

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

डॉ. स्निग्धा कांबळे
आयोजक
समाजशास्त्र विभाग प्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, ब्रम्हपुरी

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

डॉ. अझिझुल हक
प्राचार्य
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, ब्रम्हपुरी

# मराठी समाजशास्त्र परिषदेचे २९ वे राष्ट्रीय अधिवेशन

## दि. १८ व १९ जानेवारी २०१९

आयोजक: समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर

**-शोध निबंधाचा विषय-**

## "प्रसारमाध्यमे आणि ग्रामीण विकास"

डॉ. एल.एच. साळोक
सहायक प्राध्यापक,
समाजशास्त्र विभाग,
डॉ. बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद

प्रा. विनोद बी. खेडकर
सहायक प्राध्यापक,
समाजशास्त्र विभाग,
डॉ. एम. के. उमाठे कॉलेज,नागपूर.
Email: khedkarvinod09@gmail.com

### ➢ प्रस्तावना:

कोणत्याही देशाचा विकास हा प्रामुख्याने तेथील समाजावर अवलंबून असतो. जर समाज सशक्त, बौद्धिक दृष्ट्या सुदृढ आणि एक रूप असेल तर त्या देशाचा समाज विकसित आहे असे म्हणले जाते. मागील काही दशकात समाजाला विकासाच्या प्रक्रियेमध्ये सामावून घेण्याची महत्त्वपूर्ण भूमिका प्रसारमाध्यमांची राहिली आहे. तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे प्रसारमाध्यमांना आधुनिक स्वरूप प्राप्त झाले आहे. प्रसारमाध्यमांना जनतेचा 'तिसरा डोळा' म्हटले तरी ते अतिशयोक्ती ठरणार नाही, कारण प्रसारमाध्यमांमुळे व्यक्तीला जगातील कोणत्याही कोपऱ्यातील माहिती क्षणार्धात उपलब्ध होते. भातातील ७० टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्या ग्रामीण भागामध्ये वास्तव्यास आहे. अशा ग्रामीण भागामध्ये अनेक प्रश्न आहेत. दारिद्र्य, बेरोजगारी, आरोग्य, पाणीप्रश्न इत्यादी प्रश्नांकडे शासनाचे व सामान्यांचे लक्ष वेधण्यासाठी प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वाची ठरते. विविध कार्यक्रमांमध्ये साक्षरता, लोकसंख्या नियंत्रणाची आवश्यकता, रोजगाराच्या संधी, शेती विकासाचे नवीन प्रयोग, बाल व महिला कल्याण, सामाजिक आरोग्य, स्त्रीभ्रूणहत्या, पर्यावरण संरक्षण आणि ग्रामीण विकास इत्यादींकडे जनतेचं लक्ष वेधण्याची जबाबदारी प्रसारमाध्यमांनी अगदी लिलया पार पाडली आहे.

प्रसारमाध्यमांमुळे ग्रामीण समाजाच्या विकासाची प्रक्रिया अधिक गतिमान होते. कारण प्रसारमाध्यमांमुळे समाजामध्ये सातत्याने अंतरक्रिया घडून येत असते. ही आंतरक्रिया मंदावली की

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

## ➢ संशोधनाचे क्षेत्र:

संशोधनाचे क्षेत्र म्हणून नागपूर जिल्ह्यातील उमरेड तालुक्यातील परसोडी गट ग्रामपंचायतीची निवड केली आहे. या गट ग्रामपंचायतीमध्ये परसोडी, तिखाडी, उमरा, दुधा या गावांचा समावेश होतो.

## ➢ नमुना निवड:

प्रस्तुत संशोधनासाठी गावातील शासकीय योजनांचा लाभ घेतलेल्या कुटुंबांची निवड केली आहे. संशोधकाने गैर-संभाव्यता नमुना निवड पद्धतीतील सहेतुक किंवा उद्देशपूर्ण नमुन्यांची निवड करुन यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने ५० लाभार्थ्यांची अभ्यासासाठी निवड केली आहे.

## ➢ तथ्य संकलनाची पद्धती:

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक पद्धतीतील मुलाखत अनुसूची या तथ्य संकलन स्त्रोताची व दुय्यम पद्धतीतील प्रकाशित साहित्य, लेख, मासिके, वर्तमानपत्रे, ग्रामपंचायत रेकॉर्ड व इंटरनेटचा उपयोग केला आहे.

## ➢ ग्रामपंचायत अंतर्गत राबविलेल्या विविध विकास योजना:

परसोडी हे गाव नागपूर जिल्ह्यातील उमरेड तालुक्यांमध्ये असून येथे गट ग्रामपंचायत अस्तित्वात आहे. यामध्ये परसोडी, तिखाडी, उमरा व दुधा या गावांचा समावेश होतो.[1] 2011 च्या जनगणनेनुसार या गावांची लोकसंख्या 1172 (परसोडी-601, तिखाडी-221, उमरा-127 व दुधा-163) इतकी असून 348 उंबरे (परसोडी-193, तिखाडी-50, उमरा-55 व दुधा-50 आहेत.[2] या ग्रामपंचायत अंतर्गत हागनदारी मुक्त गाव योजनेअंतर्गत संडास व्यवस्था असून १०० टक्के गाव हागणदारीमुक्त झाले आहे. उमरेड पंचायत समिती अंतर्गत हे गाव 2016 मध्ये हागणदारी मुक्त गाव झाले असून या गावात सांडपाण्याची व्यवस्था, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे. या ग्रामपंचायतीमध्ये 2018-19 या कालावधीत सर्वांना घरकुल योजनेअंतर्गत १०० कुटुंबांना घरे मिळाली आहेत. तसेच लोकांची जनधन योजने अंतर्गत बँकेमध्ये खाते आहेत. तर ३० कुटुंबांना जलसिंचन अंतर्गत विहिरी मिळालेल्या असून २०० लोकांनी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेचा लाभ घेतला आहे. तसेच ५० कुटुंबांनी कृषी कर्ज योजनेअंतर्गत शेतीसाठी कर्ज घेतले आहे. त्याचबरोबर सुकन्या समृद्धी योजनेअंतर्गत ५० कुटुंब लाभ घेत आहे.[3] यावरून असे म्हणता येते की विकासाच्या योजनांच्या

---

[1] ग्रामपंचायत पाहणी अहवाल.२०१८-१९. गट ग्रामपंचायत परसोडी ता. उमरेड, जि. नागपूर.

[2] लोकसंख्या पाहणी अहवाल २०११.

[3] ग्रामपंचायत पाहणी अहवाल.२०१८-१९. गट ग्रामपंचायत परसोडी ता. उमरेड, जि. नागपूर.

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

थोडक्यात, शासनाच्या विविध योजनांची माहिती मिळवण्यासाठी मोबाईल, इंटरनेट, टी.व्ही. व वर्तमानपत्रे यांचा उपयोग मोठ्या प्रमाणात केला जातो.

**उत्तरदात्यांकडे असलेला शासकीय नळ व सांडपाणी नियोजन आणि त्यांच्या माहितीचा स्त्रोत**

| अ.क्र. | शासकीय नळ व सांडपाणी नियोजन | माहितीचा स्त्रोत | | | | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वर्तमानपत्रे | टी.व्ही. | मोबाईल व इंटरनेट | वर्तमानपत्रे, टी.व्ही., मोबाईल व इंटरनेट | | |
| १ | सुविधा आहे | -- | १३<br>२६% | -- | ३७<br>७४% | ५० | १०० % |
| २ | सुविधा नाही | -- | -- | -- | -- | | |
| एकूण | | -- | १३<br>२६% | -- | ३७<br>७४% | ५० | १०० % |

उत्तरदात्यांनी शासनाच्या नळ योजना व सांडपाणी नियोजन योजनेचा लाभ घेतला आहे का आणि त्यांच्या माहितीच्या स्रोतांचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, सर्वच 100% उत्तरदात्यांकडे शासकीय नळ व सांडपाणी नियोजनाची सुविधा उपलब्ध आहे. पैकी 26% उत्तरदात्यांना या योजनेची माहिती टी.व्ही. द्वारे प्राप्त झाली असून 74% उत्तरदात्यांना वर्तमानपत्रे, टी.व्ही., मोबाईल व इंटरनेट च्या द्वारे योजनेची माहिती प्राप्त झाली आहे.

थोडक्यात परसोडी गट ग्रामपंचायत अंतर्गत १००% ग्रामस्थांकडे शासकीय नळ व सांडपाणी नियोजनाची सुविधा असून वर्तमानपत्रे, टी.व्ही., मोबाईल, इंटरनेट हे या योजनेच्या माहितीचा मुख्य स्रोत आहे. परसोडी या ग्रामपंचायत अंतर्गत गावांमध्ये शासकीय नळ योजना असून सर्वांकडे नळ कनेक्शन आहे. तसेच सांडपाण्याची व्यवस्था ग्रामपंचायत अंतर्गत जलपुनर्भरनाची व्यवस्था केली आहे. याची माहिती त्यांना टी.व्ही., वर्तमानपत्रे, मोबाईल व इंटरनेटच्या माध्यमातून प्राप्त झाली. भारतात दळणवळणाच्या साधनांबरोबर प्रसारमाध्यमे ग्रामीण भागांमध्ये तात्काळ पोहोचली आहेत. या माध्यमातून येणाऱ्या जाहिराती, दिल्या जाणाऱ्या माहितीमुळे शासनाच्या योजनांचा लाभ उत्तरदात्यांना घेता आला आहे.

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

योजनेचा लाभ 12 टक्के उत्तरदात्यांनी घेतला असून, पैकी सर्वांनाच टी.व्ही. द्वारे याची माहिती प्राप्त झाली, तर राष्ट्रीय कृषी विकास योजना व ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण याचा लाभ घेतलेल्या उत्तरदात्यांचे प्रमाण प्रत्येकी ०४ टक्के असून त्यांच्या माहितीचा स्रोत वर्तमानपत्रे हा आहे. तर २० टक्के उत्तरदात्यांनी मुद्रा योजनेचा लाभ घेतला असून, त्यांना टी.व्ही. व वर्तमानपत्राद्वारे माहिती मिळाली. तर १४ टक्के उत्तरदात्यांनी सुकन्या समृद्धी योजनेचा लाभ घेतला असून, त्यांच्या माहितीचा स्रोत रेडिओ, टी.व्ही. व वर्तमानपत्रे हा आहे. तसेच १८% उत्तरदात्यांनी पंतप्रधान जीवन ज्योति बीमा योजना, सुकन्या समृद्धी योजना व मनरेगा योजनेचा लाभ घेतला असून, त्यांच्या माहितीचा स्रोत टी.व्ही. व वर्तमानपत्रे हा होता. तर २० टक्के उत्तरदात्यांनी ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण, महिला किसान सशक्तीकरण परियोजना व बचत गट योजनेचा लाभ घेतला असून, त्यांच्या माहितीचा स्रोत टी.व्ही. व वर्तमानपत्रे हा आहे. तसेच ज्या उत्तरदात्यांनी शासकीय योजनेचा लाभ घेतला आहे, पैकी ७६% उत्तरदात्यांच्या माहितीचा स्रोत टी.व्ही. व वर्तमानपत्रे हा आहे.

यावरून असे म्हणता येते की, सुकन्या समृद्धी योजना, ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण, महिला किसान सशक्तीकरण परियोजना, बचत गट, मनरेगा, पंतप्रधान जीवन ज्योति बीमा योजना इत्यादी योजनेचा लाभ सर्वाधिक उत्तरदात्यांनी घेतला असून, बहुतांश उत्तरदात्यांना याची माहिती टी.व्ही. व वर्तमानपत्रांमधून मिळाली आहे. केंद्र सरकार राष्ट्रीय ग्रामीण जीवन्नोती अभियान चालवत असून या अभियानाअंतर्गत कौशल्यवृद्धी प्रशिक्षण, महिला किसान सशक्तीकरण, दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य विकास या योजना राबवत आहे. याचा उद्देश हाच की महिलांना सामाजिक व आर्थिक दृष्ट्या सशक्त बनविणे, युवकांमध्ये कौशल्य निर्माण करून त्यांना रोजगार उपलब्ध करून देणे, विविध संधी निर्माण करणे, व्यवस्थापन क्षमता वाढविणे, कुटुंब व समाज स्तरावर खाद्य आणि पोषण सुरक्षा देणे. या योजनांचा ग्रामीण समाज अधिक प्रमाणात लाभ घेत आहे. या विविध शासकीय योजनांची माहिती टिव्ही वर्तमानपत्रांमधून ग्रामीण समाजाला मोठ्या प्रमाणात मिळत आहे.

## ➢ समारोप:

प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेले गाव हे गट ग्रामपंचायत असून ११७२ त्याची लोकसंख्या आहे. शासनाच्या विविध योजना या गट-ग्रामपंचायती अंतर्गत सक्षम पणे राबविल्या आहेत. पैकी स्वच्छ भारत मिशन अंतर्गत १००% गाव हागणदारीमुक्त असून यासाठी पंचायत समिती उमरेड यांचा पुरस्कारही प्राप्त झाला आहे. या ग्रामपंचायत अंतर्गत शासनाच्या सर्वांना घर, अपघात विमा, कृषी कर्ज विमा, स्वर्णजयंती महाग्राम विकास योजना, ग्रामसचिवालय, प्रियदर्शनी आवास योजना, ग्रवित-ग्रामीण विकास के लिये तरुण योजना, महात्मा गांधी ग्रामीण वस्ती योजना, राष्ट्रीय कृषी

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR ★
PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022